# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८३ /२०२३ दि. ०३/११/२०२३

## " वाहतूक नियंत्रण अधिसुचना "

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **नौपाडा** वाहतूक उप विभागाचे हद्दीत १) चिंतामणी चौक सर्कल समोर, २) राजावंत ज्वेलर्स समोर, ३) न्यु इंग्लिश स्कूल जवळ संजीवनी मेडिकल समोर, ४) पु. ना. गाडगीळ चौक, ५) शिवाप्रसाद हॉटेलच्या बाजूस या ठिकाणी **'दिपावली'** सणानिमित्त **दि. १२/११/२०२३ रोजी 'दिवाळी पहाट'** हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाचे वेळी बहुसंख्य नागरिक कार्यक्रमास सहभागी होवून गर्दी होते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) डॉ. मुस चौक कडून गडकरी सर्कलच्या दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने डॉ. मुस चौक येथून सरळ टॉवर नाका, टेंभीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) गडकरी सर्कल कडून डॉ. मुस चौक च्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गडकरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गडकरी सर्कल येथून अल्मेडा चौक, वंदना टी पॉईट, गजानन चौक, तीन पेट्रोल पंप, हरीनिवास सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) घंटाळी साईनाथ चौक कडून पु. ना. गाडगीळ चौकाचे दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्रध्दा वडापाव, घंटाळी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने घंटाळी चौकातून घंटाळी देवी पथ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) गजानन महाराज चौक ते तीन पेट्रोल पंप या सावरकर रोडवरील काका सोहनी पथ गल्लीतून गाडगीळ चौकसच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **काका सोहनी पथ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने तीन पेट्रोल पंप, हरीनिवास सर्कल मार्गे अथवा घंटाळी रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) राजमाता वडापाव सेंटर कडून गजानन महाराज चौकाच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **राजमाता वडापाव सेंटर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने राजमाता वडापाव सेंटर येथून गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. १२/११/२०२३ रोजी सकाळी ०६.०० ते १४.०० वाजेपर्यंत अंमलात राहील.

CamScanner

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :–**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहार
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–१, ठाणे व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner